**RNI No. MAHBIL /2009/36619**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

**वर्ष १०, अंक ६३(१५)]** **बुधवार, ऑक्टोबर ९, २०२४/आश्विन १७, शके १९४६** **[पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००**

**असाधारण क्रमांक १२९**

**प्राधिकृत प्रकाशन**

### विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांजकडून

**अनुसूची-V**

महाराष्ट्र ग्रामपंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, २०१४ अंतर्गत नियम ४ अन्वये गाव जाहीर करण्यासाठी विभागीय आयुक्तांनी प्रसिद्ध करावयाच्या अधिसूचनेचा नमुना.

**अधिसूचना**

क्रमांक मशा/कार्या-५/प्रशासन/पेसा/एस.आर-११७/ई२४८१९२७/CR७१४/२०२४.—महाराष्ट्र ग्रामपंचायतीसंबंधिचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, २०१४ च्या नियम ४ अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून पाडा/ पाड्यांचा समुह, वस्ती/वस्त्यांचा समुह, वाडी/वाड्यांचा समुह गाव म्हणून विनिर्दिष्ट करण्यात येते;

आणि ज्याअर्थी **मोखाडा** तालुक्यातील **खोच** ग्रामपंचायतीतील **कळमवाडी (मनाखाच)** पाडा/ वस्ती/ पाडयांचा समुह / वस्त्यांचा समुह यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, २०१४ च्या नियम ४ प्रमाणे दिनांक १९/०४/२०२३ रोजी गाव जाहीर करण्यासंदर्भात ठराव केलेला आहे;

आणि ज्याअर्थी सहायक जिल्हाधिकारी, जव्हार, विभाग जव्हार यांनी यासंदर्भात दिनांक ०९/०१/२०२४ रोजी खोच ग्रामपंचायतीत येणाऱ्या पाडा/वस्ती/पाडयाचा समुह/वस्त्यांचा समुह यांची संबधीत नोंदणीकृत मतदार व स्थानिक अधिका-यांच्या उपस्थितीत चौकशी केली आहे;

आणि ज्याअर्थी **जिल्हाधिकारी, पालघर** यांनी चौकशीअंती संबंधित पाडा/ वस्ती/ पाड्यांचा समुह/ वस्त्यांचा समुह यांना गाव घोषित करण्याची शिफारस केलेली आहे;

आणि त्याअर्थी मी **विकास पानसरे, विभागीय आयुक्त, कोकण विभाग** पेसा नियमाच्या नियम ४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून **मोखाडा** तालुक्यातील **खोच** ग्रामपंचायतीतील **कळमवाडी (मनाखाच)** येथे पाडा/वस्ती/ पाड्यांचा समुह/वस्त्यांचा समुह यास पेसा नियम ४ अंतर्गत गाव घोषित करीत आहे.

सदर गावांच्या नैसर्गिक हद्दीचे तपशील तसेच संबंधित नैसर्गिक साधनांच्या वापराची पारंपारिक हद्द खालीलप्रमाणे आहे :—

| अ.क्र. | हद्दीचे तपशील | समुह नंबर/ कम्पार्टमेंट नंबर | इतर खुणा ( आवश्यक असल्यास) |
|---|---|---|---|
| १. | पुर्वेस | - | धोंडमा-यांचीमेट |
| २. | पश्चिमेस | - | पुलाची वाडी |
| ३. | दक्षिणेस | - | पळसुंडा |
| ४. | उत्तरेस | - | खोच |

सदर गाव जाहीर केल्यानंतर जाहीर केलेल्या गावांचे क्षेत्र वगळुन उरलेले क्षेत्र मुळ गाव म्हणुन ओळखले जाईल. या गावासाठी पेसा अधिनियमातील तरतूदी व नियमातील तरतुदी लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कोंकण भवन, नवी मुंबई.
दिनांक २ ऑक्टोबर २०२४.

**विकास पानसरे,**
विभागीय आयुक्त, कोकण विभाग.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.